RIETER



# रियटर आचार संहिता

## प्रस्तावना,

रियटरला व्यावसायिक कामकाजा संदर्भात आचार नियमावलीची गरज काय ?
रियटर कायम सामाजिक जबाबदा-यांचे पालन करते, तसेच नावलौकिक आणि सचोटी ही रियटरच्या दृष्टीने त्यांची महत्वाची स्पर्धात्मक बलस्थाने आहेत.

बहूराष्ट्रीय कंपनी असल्याने रियटर ज्या देशांमध्ये कारभार करते त्या सर्व देशांचे स्थानिक कायदे आणि नियम यांचे पालन करते. रियटरचे व्यावसायिक संबंध त्यांच्या सर्व भागीदारांबरोबर हे सचोटीच्या आणि विश्वासाच्या तत्वांवर आधारित आहेत. यासाठी सर्वमान्य अशा वागणुकीबाबत नैतिक तत्वांनी बांधील आणि मार्गदर्शक अशा संचाची गरज असते.

रियटरची व्यावसायिक व्यवहार करताना पाळाव्या लागणा-या नियमांची नियमावली (संहिता) ही किमान वागणुकीचे मार्गदर्शन करते. मात्र जिथे स्थानिक कायदे रियटर संहितेपेक्षा अधिक प्रमाणभूत असतील तेथे स्थानिक कायदयांना आणि त्यांच्या तरतुदींना प्राधान्य देण्यात येईल.

रियटरची सर्व बिझनेस युनिट्स, त्यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांची वागणूक आणि कृती ही संयुक्त राष्ट्र वैश्विक संघाच्या मानवी अधिकारांसाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे, जागतिक कामगार संघटनेच्या मुळ मुल्यांप्रमाणे तसेच रियटर ही बहुराष्ट्रीय कंपनी असल्याने त्यांना आर्थिक सुधार आणि सहकार संघटना यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे असते.

सदरील आचार संहिता कोणत्याही प्रकारच्या वैयक्तिक जबाबदारी किंवा सामान्य ज्ञान यांना पर्याय नाही. जर कोणत्याही कर्मचा-याला केलेल्या कृतीबद्दल काही दुविधा असेल आणि त्याचे निराकरण या आचार संहितेतून होत नसेल तर त्याने किंवा तिने केलेले कृत्य कायदेशीर आहे किंवा नाही, रियटरच्या चांगल्या नावलौकिकावर परिणाम करू शकते किंवा नाही, तसेच बरोबर काम करणारे सहकारी किंवा कुटुंबियांना पेचात टाकू किंवा नाही याची चाचपणी करावी.

सदरील आचार संहिता कोणास लागू होईल ?
सदरील आचार संहिता ही रियटर व्यवस्थापनाच्या आधिपत्याखाली येणा-या सर्व कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी यांना लागू होते. सदरील आचारसंहिता हि नोकरीच्या करारातील एक अविभाज्य भाग आहे व ती नवीन येणारे अधिकारी आणि कर्मचारी यांस नोकरीला सुरूवात करण्याच्यावेळी दिली गेली पाहिजे. जर का कोणत्याही अधिकारी आणि कर्मचारी यांना या आचार संहितेचे किंवा त्यातील तरतुदींचे उल्लंघन केले तर त्यांच्या विरूद्ध कंपनीच्या स्थानिक नियमांप्रमाणे योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व त्यामुळे त्यांचा नोकरीचा करार रद्द होऊ शकतो. शिवाय संहितेच्या भंगामुळे कोणत्याही कायदयाचे उल्लंघन होत असेल तर अशा वेळी संबंधित व्यक्तीविरूद्ध फौजदारी कार्यवाही सुद्धा होऊ शकते.

वरिष्ठांनी या संहितेत नमूद केलेल्या तत्वांना अनुसरून त्यांचे काम अशा पद्धतीने करावे की जे त्यांच्या कर्मचा-यांपुढे आदर्श ठरेल. तसेच त्यांच्यावर त्यांच्या कर्मचा-यांना आचार संहितेबद्दल माहिती देण्याची, पालन करण्यासाठीचे प्रोत्साहन देण्याची तसेच त्याचे पालन होत असल्याचे निरिक्षण करण्याची जबाबदारी राहील.

सल्लागार, मध्यस्थ किंवा सब कॉन्ट्रक्टर यांना रियटर बरोबर काम करतांना नैतिक मुल्यांचा सन्मान करण्यासाठी आणि संहितेला अनुसरून वागण्यासाठी प्रोत्साहित करावे. ज्या त्रयस्थ व्यक्ती सदरील आचार संहितेच्या तत्वांना धरून काम करू इच्छितात अशा व्यक्ती किंवा संस्थाबरोबरच रियटर ग्रुप काम करण्यास उत्सुक राहील.

कोणतेही मध्यस्थ जे रियटरच्या नावाने काम करतात किंवा त्यांच्या वागणूकीचा रियटरच्या नावलौकिकावर प्रत्यक्षरित्या परिणाम होऊ शकतो, अशा सर्व मध्यस्थांनी सदरील आचार संहितेचे पालन करणे आवश्यक आहे.

चौकशी आणि आचार संहिताभंगाची सूचना
एखाद्या कर्मचा-यास त्याने कोणती कृती करावी असा संभ्रम असेल तर त्याने किंवा तिने स्वतःच्या वरिष्ठांशी किंवा विभागाशी संपर्क करावा.

रियटरच्या सर्व कर्मचा-यांना प्रोत्साहित केले जाते की त्यांनी आचार संहिताभंगाची माहिती त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास खंबीरपणे आणावी. जर एखाद्या कर्मचा-याला त्याच्या किंवा तिच्या स्वतःच्या वरिष्ठांकडे जाण्यास संकोच वाटत असेल तर योग्य पर्याय म्हणून त्यांनी संहिताभंगाची माहिती “Integrity Line” वर https://rieter.integrityplatform.org द्वारे पाठवावी.

कर्मचा-यांनी आचारसंहिताभंग निदर्शनास आणणे हे रियटरच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट हिताचे आहे. या कारणास्तव आचारसंहिताभंग निदर्शनास आणणारे कर्मचारी किंवा त्या संदर्भात प्रश्न विचारणारे यांचे विरोधात रियटर कोणत्याही प्रकारचा भेदभाव खपवून घेणार नाही, जरी त्याने किंवा तीने केलेली तक्रार सिद्ध झाली किंवा नाही.

## १. व्यावसायीक मुल्ये

रियटरच्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी अशी कोणतीही कृत्ये करू नये जेणेकरून आपल्या व्यावसायीक भागीदारांचा आणि सर्वसाधारण लोकांचा रियटरवरील विश्वासास तडा जाईल. विशेषतः भ्रष्ट किंवा अनैतिक कृत्य करण्यास बंदी आहे.

लाच
रियटरचे कोणतेही अधिकारी, कर्मचारी किंवा मध्यस्थ हयांनी कोणत्याही प्रकारचे प्रस्ताव, आश्वासन, किंवा मौल्यवान वस्तू सरकारी अधिकारी किंवा रियटरच्या ग्राहकांचे किंवा पुरवठादारांचे प्रतिनिधी यांस देवून कोणताही अयोग्य फायदा घेवू नये हयात एखादे आश्वासन किंवा दैनंदिन काम लवकरात लवकर करून घेण्याचा हेतू सुद्धा समाविष्ट असेल. रियटरच्या ज्या अधिकारी आणि कर्मचा-यांसमोर लाच देण्याचा किंवा घेण्याचा प्रस्ताव आला असेल त्यांनी ही माहिती तातडीने तिच्या किंवा त्यांच्या वरिष्ठांना कळविली पाहिजे.

रियटरच्या कोणत्याही अधिकारी आणि कर्मचा-याने ग्राहक, पुरवठादार, किंवा इतर व्यावसायीक भागीदारांकडून कोणतेही बक्षीस किंवा सहकार्याचे आश्वासन देवू किंवा घेवू नये. यांस अपवाद म्हणजे कमी किंमतीच्या वस्तू (ज्यांचे मुल्य सी एच एफ १५० किंवा स्थानिक चलनास समतोल असलेले व खरेदीशक्तीस समतोल असलेले मात्र स्थानिक कायद्यांचे पालन करून) किंवा रोजच्या व्यावसायीक कार्यक्रमांचे निमंत्रण, ग्राहकांच्या निमंत्रणावरून ज्या कार्यक्रमास एका दिवसाच्या वर उपस्थिती किंवा व्यापक प्रमाणात प्रवास करावा लागणार असेल अशा कार्यक्रमास कर्मचा-याला त्याच्या वरिष्ठांच्या पूर्व परवानगीची गरज असेल. कोणतेही रोकड रकमेचे किंवा रक्कम स्वरूप बक्षीस, बेकायदेशीर किंवा तसेच जे बक्षीस अनैतिक मोबदला मिळविण्यास परतावा म्हणून दिले असेल त्याचे मुल्य विचारात न घेता कधीही मान्य केले जाणार नाही.

हित मतभिन्नता

रियटरच्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे दैनंदिन कामकाजातील वर्तन हे रियटर ग्रुपच्या हिताच्या दृष्टीने असावे. तसेच अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वतःचे हित हे रियटरच्या हिताच्या आड येत असेल अशा परिस्थिती टाळाव्यात.

ज्या कंपनीत रियटरच्या अधिकारी आणि कर्मचारी यांचे हितसंबंध असतील व जिच्या बरोबर रियटरच्या कंपनी व्यवसाय करतात, अशा कंपनीत असलेले आर्थिक व इतर हितसंबंधातील माहिती रियटरच्या अधिकारी व कार्मचा-यांनी जाहीर करणे आवश्यक आहे. स्टॉक एक्सचेंज वर नोंदणीकृत कंपन्यांमध्ये असलेले शेअर्स वगळता इतर सर्व आर्थिक हितसंबंधांची माहिती कर्मचा-यांने त्याच्या वरिष्ठांना आणि ग्रुप सचिवास जाहीर करणे आवश्यक आहे. इतर हितसंबंध जे जाहीर करणे आवश्यक आहेत, परंतू मर्यादित नाहीत ह्यात संचालक आणि सल्लागार मंडळावरील नियुक्ती व सल्लागार नियुक्तीचे करार समाविष्ट आहेत. वरील जाहीर करण्याची गरज जवळच्या नातेवाईकासंबधी सुद्धा लागू आहे. परंतू ते पुढे नमुद केलेल्या नातेवाईकापुरती मर्यादित नाही म्हणजेच नवरा किंवा बायको, पालक, मुले, भाऊ, बहिण आणि त्यांचे नवरा किंवा बायको.

रियटरचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी शेअरर्सची खरेदी विक्री करतांना इनसायडर डिलिंग लेजिस्लेशनचे पालन करणे बंधनकारक आहे.

स्पर्धा

रियटर ज्या देशांमध्ये व्यवसाय करते त्या सर्व देशांमधील स्पर्धा विषयक आणि ॲन्टी ट्रस्ट लॉ चे पालन करते आणि असे कोणतेही कृत्य करत नाही कि ज्यामुळे स्पर्धेला बाधा येईल, विशेषतः रियटरची बिझनेस युनिट्स कधीही

- किंमत निश्चिती किंवा किंमतीची व इतर व्यावसायीक संदर्भातील अटींची स्पर्धकांबरोबर चर्चा करत नाही.
- बाजारपेठचे विभाजन होईल अशी कोणतीही योजना स्पर्धकांबरोबर करत नाही.
- ग्राहकांचे स्वातंत्र्य अबाधित राहील अशाच व्यावसायीक मुल्यांचा वापर करतात.

बौद्धिक मालमत्तेचे अधिकार आणि विश्वासार्ह माहिती

रियटर स्वतःचा व्यवसाय विषयक विश्वासार्ह माहितीचे संरक्षण करण्यासाठी तसेच त्यांचे व्यावसायीक भागीदार आणि इतर त्रयस्थ व्यक्तीच्या बौद्धिक मालमत्ता अधिकारांचा आणि विश्वासार्ह माहितीचा योग्य तो सन्मान करण्यासाठी बांधील राहील.

ज्या सामग्रीवर इतर व्यक्तींचा कॉपी रायटेड हक्क किंवा तिस-या व्यक्तींचा ट्रेडमार्क हक्क असेल अशा कोणत्याही सामग्रीचा उपयोग रियटरचे अधिकारी आणि कर्मचारी मुळ मालकाच्या परवानगीशिवाय करणार नाहीत.

रियटरचे अधिकारी आणि कर्मचारी रियटरच्या मालकीची माहिती गोपनीय ठेवतील. मालकीच्या माहितीमध्ये व्यावसायीक गुपीते, ज्ञात माहिती, व्यावसायीक कल्पना आणि प्रक्रिया यांचा समावेश आहे परंतू ती तेवढ्यापुरती मर्यादित नाही आणि ही माहिती काटेकोरपणे गोपनीय ठेवली पाहिजे आणि तिचा वापर रियटरच्या हितासाठी केला पाहीजे. रियटरचे अधिकारी किंवा कर्मचा-यांने गोपनीय ठेवलेली माहिती त्रयस्थ व्यक्तींना सांगण्याआधी विधी विभागाची आणि स्वतःच्या वरिष्ठांची परवानगी घेतली पाहिजे.

## २. सामाजिक दृष्टीकोनातून कामाच्या वातावरणाची जबाबदारी (आरोग्य आणि सुरक्षितता मिळून)

रियटर त्यांच्या कर्मचा-यांच्या मानवी अधिकारांचा सन्मान/आदर करते आणि सर्व कर्मचा-यांना व्यावसायीक, सुरक्षित कामाचे वातावरण देते. तसेच रियटर पुढील मुल्यांचा त्यांच्या जगातील सर्व कंपन्यांमध्ये वापर करते.

- बाल कामगार

  रियटर त्यांच्या कोणत्याही कंपनीत बाल कामगार कामावर ठेवत नाही व कामासाठीच्या किमान वयोमर्यादेच्या स्थानिक कायद्यांचा आदर करते.

- सक्तीची मजुरी आणि कामाच्या वेळा

  रियटर कामासाठी कोणत्याही प्रकारच्या सक्तीचा किंवा बळाचा वापर करत नाही आणि कधीही शारिरिक अपमानास्पद शिस्तभंगाची कार्यवाही खपवून घेत नाही. तसेच कामाच्या वेळेच्या मर्यादेस बंधित असणा-या सर्व स्थानिक कायद्यांचे पालन करते.

- छळ आणि भेदभाव

  रियटर पुढील पैकी कोणत्याही प्रकारचा छळ आणि भेदभाव करत नाही की जो जात, धर्म, पंथ, लिंग, कामगार संघटनांचे किंवा राजकारणी पक्षांचे सभासदत्व, वय, वैवाहिक / पालकांचे स्तर, गर्भावस्था, राष्ट्रीयत्व / वंशीय दृष्ट्या, सामाजिक गण, शारीरीक कमीपणा / लैंगिकभिमुकता यावर आधारित असेल. कर्मचा-यांचे मुल्यमापन त्यांच्या काम करण्याच्या कुवतीप्रमाणे केले जाईल यात कर्मचा-यांची वैयक्तिक वैशिष्टये, परिस्थितीचा किंवा समजुतीचा विचार केला जात नाही.

- संघटनेचे स्वातंत्र्य आणि सामुहिक सौदा

  रियटर त्यांच्या कर्मचा-यांचे संघटना तयार करणे, कामगार संघटनेत सहभागी होणे तसेच प्रतिनिधीत्व करण्याचा आणि सामुहिक सौदा करण्याचा हक्क स्थानिक कायद्याप्रमाणे अबाधीत ठेवते.

- भरपाई

  रियटर त्यांच्या कर्मचा-यांना योग्य ती नुकसान भरपाई आणि फायदे स्थानिक कायद्यांप्रमाणे देते.

- आरोग्य आणि सुरक्षितता

  रियटर त्यांच्या कर्मचा-यांच्या आरोग्यास आणि सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देते. त्या दृष्टीने रियटर ग्रुप आरोग्य आणि सुरक्षितता व्यवस्थापन यांचा व्यापक दृष्टीकोनातून विचार करतात जेणेकरून संबंधीत क्षेत्रात सातत्याने सुधारणा होवू शकेल.

## ३. पर्यावरण विषयक जबावदारी आणि उत्पादन सुरक्षितता

रियटर नैसर्गिक साधन सामुग्रीचा योग्य वापर आणि त्याचे जतन करणे याबाबतीत कायम कटीबद्ध आहे की जे रियटरच्या कच्या मालाच्या निवड प्रक्रिया, उपलब्ध साधन सामुग्रीचा योग्य वापर आणि उर्जेची बचत आणि योग्य पद्धतीने पर्यावरणाचा विचार करून केले जाणारे संशोधन आणि विकास, उत्पादन वापर आणि निचरा यावरून दिसून येते. रियटरची सर्व बिझनेस युनिट्स पर्यावरण सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कायदेशिर बाबींची पुर्णपणे पूर्तता करतात. पर्यावरण विषयक असलेल्या उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी, रियटर कायम त्यांच्या पुरवठादार आणि ग्राहकांबरोबर लक्षपुर्वक काम करते आणि त्यांना त्यांच्या श्रमात सल्ला व मदत करते की ज्यामुळे ते सर्व त्यांच्या संपुर्ण सेवा कालावधीत रियटरच्या उत्पादनांचा पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडू शकतात.

रियटरच्या उत्पादित वस्तुंची सुरक्षितता त्यांच्या ग्राहक व त्यावर काम व देखभाल करणा-या कर्मचा-यांच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहे व ही सुरक्षिततेची खबरदारी रियटरच्या उत्पादित वस्तूच्या जीवनचक्राच्या प्रत्येक टप्यामध्ये घेणे रियटरच्या दृष्टीकोनतून महत्वाचे राहील. हया क्षेत्रात सातत्याने सुधारणा साध्य करण्याच्या दृष्टीने रियटर आणि त्यांचे व्यावसायीक भागीदार एकत्रपणे येऊन काम करतील.

येथे स्पष्ट सुचित करण्यात येते की, इंग्रजी दस्त ऐवजातील रियटर आचार संहिता हे कायद्याने गृहीत धरून मानले जाईल. सहज समजता येईल या दृष्टीने आचार संहितेत कोणताही ठरावीक लिंगाचा उल्लेख केलेले नाही. व्यक्तिबद्दल केलेला कोणताही उल्लेख सर्व लिंगांस लागू होईल.

विंटरथुर २५.०४.२०२३ पासून वैध.
Rieter Holding Ltd.





थॉमस ऑटर्ली
मुख्य कार्यकारी अधिकारी

थॉमस एन्वँडर
ग्रुप सचिव व जनरल कौन्सिल

**Rieter Holding Ltd.**
Klosterstrasse 32
Casella postale
CH-8406 Winterthur
T +41 52 208 71 71
F +41 52 208 70 60
www.rieter.com

या दस्‌तऐवजाची इंग्‌रजी आवृत्‌ती कायदेशीररत्‌िया लागू आहे.

3597-v2 in 2304